भारतीय रिज़र्व बैंक

**RESERVE BANK OF INDIA**

www.rbi.org.in

आरबीआय/२०१०-११/३४४
डीजीबीए.सीडीडी.क्र.एच-४३११/१५.०२.००१/२०१०-११ डिसेंबर २७, २०१०

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/व्यवस्थापकीय संचालक
सरकारी लेखा विभाग/मुख्य कार्यालय
भारतीय स्टेट बँक/स्टेट बँक ऑफ पतियाळा/स्टेट बँक ऑफ बिकानेर व जयपूर/स्टेट बँक ऑफ त्रावणकोर/स्टेट बँक ऑफ हैद्राबाद/स्टेट बँक ऑफ म्हैसूर/अलाहाबाद बँक/बँक ऑफ बरोडा/बँक ऑफ इंडिया/बँक ऑफ महाराष्ट्र/कॅनरा बँक/सेंट्रल बँक ऑफ इंडिया/कॉर्पोरेशन बँक/देना बँक/इंडियन बँक/इंडियन ओव्हरसीज बँक/पंजाब नॅशनल बँक/सिंडिकेट बँक/युको बँक/युनियन बँक ऑफ इंडिया/युनायटेड बँक ऑफ इंडिया/विजया बँक/आयडीबीआय बँक/आयसीआयसीआय बँक.

महोदय/महोदया,

**सार्वजनिक भविष्य निर्वाह योजना, १९६८ ह्या योजनेच्या कलम ९(३) मधील सुधारणा**

आम्ही ह्यासोबत, ह्या विषयावरील भारत सरकारची अधिसूचना जी.एस.आर. ९५६ (ई) दिनांक डिसेंबर ७, २०१०१ ची एकप्रत पाठवीत आहोत. त्यातील मजकूर स्पष्टपणे समजण्यासारखा आहे.
२) ह्या अधिसूचनेमधील मजकूर आपण पीपीएफ योजना राबविण्याऱ्या आपल्या शाखांच्या नजरेस आणावा आणि पीपीएफच्या वर्गणीदारांच्या माहितीसाठी आपल्या शाखांच्या सूचना फलकांवरही प्रदर्शित करावा.

आपली
संगीता लालवाणी
(उप महाव्यवस्थापक )
सोबतः अधिसूचनेच्या ५ प्रती

वित्त मंत्रालय
(आर्थिक व्यवहार विभाग)

आधिसूचना

नवी दिल्ली, ७ डिसेंबर, २०१०

जीएसआर ९५६ (ई) - सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९६८ (१९६८ चा २३) च्या कलम ३ च्या उपकलम (४) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारत सरकार, सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधी योजना, १९६८ सुधारित करण्यासाठी पुढीलप्रमाणे योजना तयार करत आहे-

१ (१) ह्या योजनेला सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी योजना, २०१० म्हटले जावे.
(२) अधिकृत राजपत्रामधील हिच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून ही योजना जारी होईल.

२ सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी योजना, १९६८ च्या परिच्छेद ९ च्या उप-परिच्छेद (३) मध्ये, तरतुदीनंतर पुढील तरतुद टाकण्यात येईल-
“मात्र ह्याशिवाय, १३ मे २००५ पूर्वी हिंदु अविभाज्य कुटुंबाच्या वतीने उघडलेले खाते, पहिली वर्गणी भरलेल्या वर्षाची अखेर झाल्यानंतर, १५ वर्षे पूर्ण झाल्यावर बंद करण्यात येईल आणि त्या वर्गणीदाराच्या नावे जमा असलेली संपूर्ण रक्कम, त्या वर्गणीदाराने कर्ज घेतले असल्यास त्यावरील येणे असलेल्या व्याजाची तडजोड करुन, त्याला परत केली जाईल. हिंदु अविभाज्य कुटुंबाचे बाबतीत, जेथे पहिली वर्गणी भरल्याच्या वर्षाची अखेर झाल्यानंतर १५ वर्षे आधीच पूर्ण झाली असतील तेथे अशी खातीही चालु वर्ष अखेर, म्हणजे ३१ मार्च २०११ रोजी बंद करण्यात येतील आणि वर्गणीदाराने कर्ज घेतले असल्यास, त्यावरील येणे असलेल्या व्याजाची तडजोड करुन, त्या वर्गणीदाराच्या नावे जमा असलेली संपूर्ण रक्कम त्याला परत करण्यात येईल”

(एफ.क्र.एफ ७.४.२००८.एनएस.२)
एम.ए.खान
अंडर सेक्रेटरी

टीपः- ही योजना, जीएसआर ११३६ (ई) दि. १५.६.६८ द्वारा अधिसूचित करण्यात आली होती व पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आली होती- जीएसआर ३६८ (ई) दि. १.८.७२, जीएसआर २१७ (ई) दि. ९.३.७९, जीएसआर २७१ (ई) दि. १६.३.८३, जीएसआर ५४ (ई) दि. ७.२.८४, जीएसआर ८९५ (ई) दि. २३.६.८६, जीएसआर १०१३ (ई) दि. ६.७.९९, जीएसआर ९०८ (ई) दि. ६.१२.२०००, जीएसआर ६७९ (ई) दि. ४.१०.२००२, जीएसआर ७६८ (ई) दि. १५.११.२००२, जीएसआर ५८५ (ई) दि. २५.७.२००३, जीएसआर ६९० (ई) दि. २७.८.२००३, जीएसआर ७५५ (ई) दि. १९.११.२००४, आणि जीएसआर २९१ (ई) १३.५.२००५.